आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

२९ जून २०२५ - रविवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- लोक-सहभागाच्या बळावर मोठमोठ्या संकटांचा सामना करता येऊ शकतो हे आणीबाणीच्या काळानं दाखवून दिल्याचं प्रधानमंत्र्यांचं मन की बात मधे प्रतिपादन/ पर्यावरण रक्षणाच्या प्रयत्नांची दिली माहिती.

- अहमदाबाद विमान अपघात प्रकरणी घातपाताची शक्यता आढळली नसून सर्वंकष चौकशी होईल, असं हवाई वाहतूक राज्यमंत्र्यांचं आश्वासन

- अमेरिकन खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत महिला गटात तन्वी शर्मा आणि पुरुष गटात आयुष शेट्टी यांची अंतिम फेरीत धडक

**आणि**

- ओदिशामध्ये पुरी इथं भगवान जगन्नाथाच्या रथयात्रेत चेंगराचेंगरी होऊन तीन भाविकांचा मृत्यू, तर १२हून अधिक जण जखमी

**<><><><>**

लोक-सहभागाच्या बळावर मोठमोठ्या संकटांचा सामना करता येऊ शकतो हे आणीबाणीच्या काळानं दाखवून दिल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज आकाशवाणीवर मन की बात या कार्यक्रमात सांगितलं. हा या कार्यक्रमाचा एकशे तेविसावा भाग होता. आणीबाणी लादण्याच्या घटनेला पन्नास वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त, देशात संविधान हत्या दिवस पाळला गेला त्याबद्दल ते बोलत होते.

**--- होल्ड - पीएम - बाईट --**

यासंदर्भात मोरारजी देसाई आणि अटल बिहारी वाजपेयी या माजी प्रधानमंत्र्यांनी आणीबाणीच्या निषेधात केलेल्या भाषणांचा अंश ही त्यांनी श्रोत्यांना ऐकवला.

आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त यावर्षी विशाखापट्टणम इथं झालेल्या मुख्य कार्यक्रमासह, देश आणि परदेशात विविध ठिकाणी झालेल्या अभिनव उपक्रमांचा तसंच त्यातल्या अभूतपूर्व लोकसहभागाचा गौरवपूर्ण उल्लेख त्यांनी केला. जगातल्या मोठ मोठ्या शहरांमधे झालेल्या योग दिन सोहळ्याच्या छायाचित्रांमध्ये शांतता, स्थैर्य आणि संतुलन

दिसल्याचं निरीक्षणही त्यांनी मांडलं. एक पृथ्वी एक आरोग्य ही योगदिनाची या वर्षाची संकल्पना म्हणजे केवळ एक घोषणा नसून वसुधैव कुटुंबकमची जाणीव करून देणारी संकल्पना असल्याचं ते म्हणाले.

नुकत्याच झालेल्या जागतिक पर्यावरण दिनाविषयी त्यांनी देशभरात केल्या जात असलेल्या अनुकरणीय प्रयत्नांचा उल्लेख केला. पुण्याचे रमेश खरमाळे वन संवर्धनासाठी करत असलेल्या कार्याची माहिती त्यांनी श्रोत्यांना दिली. मन की बात मधे आपल्या कार्याचा उल्लेख झाल्याबद्दल रमेश खरमाळे यांनी आकाशवाणीकडे आपल्या भावना व्यक्त केल्या.

- **होल्ड बाईट - रमेश खरमाळे -**

छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यातल्या पाटोदा ग्रामपंयाचतीनं प्रयत्नपूर्वक कार्बन तटस्थता गाठल्याची माहितीही प्रधानमंत्र्यांनी श्रोत्यांना दिली. लहानसहान सवयींमधून जेव्हा सामूहिक निर्धार उभा राहतो तेव्हा निश्चितपणे फार मोठं परिवर्तन घडून येतं असं ते म्हणाले.

यानिमित्तानं त्यांनी एक पेड, माँ के नाम या अभियानाचं पुन्हा पुन्हा एकदा स्मरण करून देत, या अभियानात सहभागी होण्याचं आणि भावी पिढ्याचं भविष्य सुरक्षित करण्याचं आवाहन श्रोत्यांना केलं.

जागतिक आरोग्य संघटनेनं भारत हा ट्रॅकोमा या डोळ्यांच्या आजारापासून मुक्त झाल्याची घोषणा  केली असल्याची माहिती त्यांनी दिली. या आजाराविरुद्ध न थकता लढा देणाऱ्या प्रत्येकाचं हे यश असल्याचं ते म्हणाले. जलजीवन अभियानामुळे नळाद्वारे स्वच्छ पाणी पोहोचत असल्यामुळेही अशा आजारांचा धोका कमी झाला असल्याचा उल्लेख त्यांनी सांगितलं.

आपलं सामर्थ्य वाढवण्यासाठी आरोग्याकडे लक्ष देण्याचं आवाहन त्यांनी केलं. लठ्ठपणा कमी करण्यासाठी आहारात तेलाचा वापर १० टक्के कमी करण्याच्या सल्ला त्यांनी पुन्हा एकदा श्रोत्यांना दिला.

आरोग्यापासून ते सामाजिक सुरक्षेपर्यंत प्रत्येक क्षेत्रात देश परिपूर्णतेच्या भावनेनं पुढे जात असल्याचं ते म्हणाले. यासाठीच्या प्रयत्नांमुळेच आंतरराष्ट्रीय श्रम संघटनेच्या अलिकडच्या अहवालात, भारतातल्या ६४ टक्क्यांपेक्षा जास्त लोकसंख्येला आता कुठला ना कुठला सामाजिक सुरक्षा विषयक योजनांचा लाभ मिळत असल्याचा उल्लेख झाला असल्याची माहितीही त्यांनी श्रोत्यांना दिली. सद्यस्थितीत देशात सुमारे ९५ कोटी लोक

कुठल्या ना कुठल्या सामाजिक सुरक्षा योजनेचा लाभ घेत आहे, मात्र २०१५ पर्यंत हे प्रमाण २५ कोटींपेक्षा कमी होतं असं त्यांनी श्रोत्यांना सांगितलं.

महिलांच्या नेतृत्वाखाली विकास या मंत्राच्या आधारे भारत आपलं नवं भविष्य उभारत असल्याचं ते म्हणाले. यानिमित्तानं त्यांनी देशभरातली महिला उद्योजकतेची प्रेरणादायी उदाहरणं श्रोत्यांसमोर मांडली.

भारतातल्या कला कौशल्याच्या विविधतेचा उल्लेख त्यांनी केला. याच अनुषंगानं मेघालयात पारंपरिक कौशल्याचा उपयोगानं एरी रेशमाचं उत्पादन घेतलं जात असल्याची आणि या उत्पादनाला जीआय टॅग मिळाल्याची माहिती त्यांनी दिली. ग्राहकांनी या रेशीम उत्पादनासह भारतातच निर्मित उत्पादनं खरेदी करावीत, तर व्यापाऱ्यांनी भारतात तयार झालेली उत्पादनेच विकावित आणि आत्मनिर्भर भारत अभियानाला नवी उर्जा द्यावी, असं आवाहन त्यांनी केलं.

भगवान बुद्धांचे पवित्र अवशेष विविध देशातल्या जनतेच्या दर्शनासाठी पाठवण्याचा उपक्रम भारत राबवत आहे. त्याअंतर्गतच व्हिएतनाम, थायलंड आणि मंगोलियाला हे अवशेष पाठवले गेले होते. त्यानंतर तिथल्या नागरिकांनी भारताचे आभार मानणारे संदेश आपल्याला पाठवल्याची माहिती प्रधानमंत्र्यांनी श्रोत्यांसोबत सामायिक केली. भगवान बुद्धांच्या विचारांमध्ये देशांना, संस्कृतींना आणि लोकांना एका धाग्यात बांधण्याची शक्ती आहे, असं ते म्हणाले. देशभरातल्या नागरिकांनीही आपापल्या राज्यातल्या बौद्ध स्थळांना भेट देण्याचं आवाहन त्यांनी केलं.

दीर्घ काळानंतर सुरू झालेली कैलास मानसरोवर यात्रा, जुलैमध्ये सुरू होणारी अमरनाथ यात्रा, आगामी श्रावण महिना, काही दिवसांपूर्वी झालेली भगवान जगन्नाथ रथ यात्रा याचा त्यांनी भक्तिभावानं उल्लेख केला. या यात्रांमध्ये सहभागी होणारे भाविक म्हणजे एक भारत श्रेष्ठ भारत भावनेचं प्रतिबिंब असल्याचं ते म्हणाले. या यात्रांमध्ये सहभागी होणाऱ्या यात्रेकरूंना त्यांनी शुभेच्छाही दिल्या.

आंतरराष्ट्रीय अवकाश स्थानकात उतरलेले पहिले भारतीय म्हणून इतिहास रचणाऱ्या ग्रुप कॅप्टन शुभांशू शुक्ला यांच्यासोबत झालेल्या संवादाविषयी देखील प्रधानमंत्र्यांनी श्रोत्यांना सांगितलं.

येत्या १ जुलैला येणाऱ्या डॉक्टर आणि सनदी लेखापाल दिनानिमित्त यांच्या कार्याचा गौरव होणार असल्याचा उल्लेख करत प्रधानमंत्र्यांनी त्यांना शुभेच्छाही दिल्या.

<><><><>

अहमदाबाद इथं झालेल्या विमान अपघाताची विमान अपघात अन्वेषण संस्था सर्वंकष चौकशी करेल, असं माहिती नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी सांगितलं आहे. एका खासगी वृत्तवाहिनीच्या कार्यक्रमात ते बोलत होते. या शक्यतांमध्ये घातपाताची शक्यताही समाविष्ट आहे. मात्र, सध्यातरी यामागे दहशतवादी कट असल्याचं आढळून आलेलं नाही, असंही त्यांनी स्पष्ट केलं. अहमदाबाद इथं १२ जून रोजी लंडनला जाणाऱ्या एअर इंडियाच्या विमानाचा अपघात होऊन २७४ जणांचा मृत्यू झाला होता. या विमानाचा ब्लॅकबॉक्स सापडला असून तो विमान अपघात अन्वेषण संस्थेच्या ताब्यात आहे.

<><><><>

अमेरिकन खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत भारताचे दोन खेळाडू अंतिम फेरीत पोहोचले आहेत. महिला एकेरीत तन्वी शर्माने उपान्त्य फेरीत काल युक्रेनच्या पोलिना बुरहोवाचा २१-१४, २१-१६  असा पराभव केला. पोलिना बुरहोवा जागतिक क्रमवारीत सातव्या स्थानावर आहे. ६६व्या स्थानावर असलेल्या तन्वीचा सामना विजेतेपदासाठी २१ व्या क्रमांकावर असलेल्या चीनच्या बेईवेन झांगशी आज होणार आहे. सामना भारतीय प्रमाण वेळेनुसार आज रात्री साडेआठ वाजता सुरू होईल.

पुरुष गटात आयुष शेट्टीनं जागतिक मानांकनात सहाव्या क्रमांकावरचा चोऊ तिएनचेन याला २१-२३, २१-१५, २१-१४ असं हरवलं. अंतिम फेरीत त्याचा सामना तृतीय मानांकित कॅनेडियन खेळाडू ब्रायन यांग बरोबर होईल.

<><><><>

महिला टी ट्वेंटी क्रिकेटमध्ये काल इंग्लंडमधे ट्रेंट ब्रिज इथं झालेल्या पाच सामन्यांच्या मालिकेतल्या पहिल्या सामन्यात भारतानं इंग्लंडचा ९७ धावांनी पराभव केला. क्रिकेटच्या या प्रकारात स्मृती मानधनाने कारकीर्दीतलं पहिलं शतक ठोकत तडाखेबंद ११२ धावा केल्या. ती सामन्यातली  सर्वोत्कृष्ट खेळाडू ठरली.

<><><><>

ओदिशामध्ये पुरी इथे आज सकाळी भगवान जगन्नाथांच्या यात्रेवेळी चेंगराचेंगरी होऊन तीन भाविकांचा मृत्यू झाला आणि १२हून अधिक जण जखमी झाले. जगन्नाथ मंदिर परिसरातल्या गुंडिचा मंदिर इथं आज पहाटे सव्वा चारच्या सुमाराला एका ट्रकमधून लाकडं उतरवताना काही जण जखमी झाले. या घटनेमुळे गर्दीत घबराट निर्माण होऊन चेंगराचेंगरी झाली. जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आलं असून त्यापैकी सहा जणांची प्रकृती गंभीर आहे. प्रशासनानं या दुर्घटनेची चौकशी सुरू केल्याची माहिती पुरीच्या जिल्हाधिकाऱ्यांनी दिली आहे.

**<><><>**

बिहारमध्ये, सहा नगर पंचायतींची सार्वत्रिक आणि ३६ इतर नगरपालिका प्राधिकरणांच्या पोट निवडणूकीसाठी काल अंदाजे ६२ पूर्णांक ४१ शतांश टक्के मतदान झालं. या निवडणुकीत मोबाईल आधारित तंत्रज्ञानाचा वापर करून ई-मतदान प्रणालीची प्रक्रिया यशस्वीरित्या वापरण्यात आली. राज्य निवडणूक आयुक्त दीपक प्रसाद यांनी आकाशवाणीला, सांगितलं की, ई मतदानाला ७० टक्क्यांपेक्षा जास्त मतदारांचा प्रतिसाद मिळाला.

**<><><>**

उत्तराखंडमध्ये मुसळधार पावसाची शक्यता हवामान विभागानं वर्तवली असून त्यामुळे पुढच्या २४ तासांसाठी चार धाम यात्रा स्थगित करण्यात आली आहे. हरिद्वार, ऋषिकेश, श्रीनगर, रुद्रप्रयाग, सोनप्रयाग आणि विकासनगर इथं यात्रेकरूंना थांबवण्याच्या सूचना पोलीस आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहे.

गंगोत्री आणि यमुनोत्री राष्ट्रीय महामार्गावर ठिकठिकाणी दरडी कोसळल्यामुळे वाहतूक बंद आहे. नदी नाले दुथडी भरून वाहत आहेत.

**<><><>**

नैऋत्य मोसमी पाऊस आज दिल्ली, उत्तर प्रदेश, हरियाणा आणि राजस्थानमधे पुढे सरकला. त्यामुळे अंदाजित वेळेच्या नऊ दिवस आधीच नैऋत्य मोसमी पावसाने संपूर्ण भारतात प्रवेश केल्याचं हवामान विभागानं म्हटलं आहे.

**//<><><><>//**